International Year of Cooperatives 2025

महाराष्ट्र शासन

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.**

**दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७** Email - commpat2018@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/निमं-MIS/आर्थिक निकष पुर्तता/ २१४/२०२६ दिनांक :- २३ जानेवारी, २०२६

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

३) उपनिबंधक / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका / वॉर्ड (सर्व)

**विषय :- पतसंस्था MIS प्रणाली नुसार आर्थिक निकषांचे पुर्ततेबाबत आढावा घेणे.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र दि.०७/११/२०२५, १९/११/२०२५, २८/११/२०२५, ११/१२/२०२५, १९/१२/२०२५, ३०/१२/२०२५, ०१/०१/२०२६ व ०७/०१/२०२६

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रांकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगर कृषी / पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांची माहिती एकत्रित करणेसाठी 'Management Information System' (MIS) ही ऑनलाईन प्रणाली दि.११/११/२०२५ रोजी कार्यान्वित केली आहे. सदर प्रणालीद्वारे तालुका / वॉर्ड स्तरावरील उपनिबंधक / सहाय्यक निबंधक यांना त्यांचे कार्यक्षेत्रात मुख्यालय असलेल्या सर्व नागरी / ग्रामीण बिगर कृषी / पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांची एकत्रित आर्थिक माहिती उपलब्ध झालेली आहे.

सदर माहितीच्या आधारे संबंधित उपनिबंधक / सहाय्यक निबंधक, तालुका / वॉर्ड यांनी खालील निकषांची पुर्तता न करणाऱ्या त्यांचे कार्यक्षेत्रामधील नागरी / ग्रामीण सहकारी पतसंस्था तसेच त्यांचे कार्यक्षेत्रात मुख्यालय असलेल्या जिल्हास्तरीय, विभागस्तरीय व राज्यस्तरीय नागरी / ग्रामीण पतसंस्थांचा आढावा घ्यावयाचा आहे. सदर संस्थांबाबत खालील निकष पूर्ण होण्यासाठी संस्थानिहाय कृती आराखडा तयार करण्यात यावा. दरमहा होणाऱ्या आढावा सभेमध्ये संस्थांना योग्य ते मार्गदशन करावे.

| अ.क्र. | तपशिल | निकष |
|---|---|---|
| १. | CRR | १% पेक्षा जास्त |
| २. | SLR | २५% पेक्षा कमी |
| ३. | CRAR | ९% पेक्षा कमी |
| ४. | CD Ratio | ७०% पेक्षा जास्त |
| ५. | Gross N.P.A. | १०% पेक्षा जास्त |
| ६. | Net N.P.A. | ५% पेक्षा जास्त |
| ७. | थकबाकी | १०% पेक्षा जास्त |
| ८. | के.वाय.सी. पूर्तता | १००% पेक्षा कमी |

उपरोक्त निकषांची पुर्तता न करणाऱ्या संस्थांची खालीलप्रमाणे तालुकानिहाय व संस्थानिहाय यादी तयार करुन, याबाबतचा प्रगती अहवाल संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना दि.१५/०४/२०२६ पर्यंत सादर करण्यात यावा.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | तपशिल | दि.३१/०३/२०२५ अखेर सद्यस्थिती | दि.३१/०३/२०२६ अखेर सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| | | CRR - १% पेक्षा जास्त | | |
| | | SLR - २५% पेक्षा कमी | | |
| | | CRAR - ९% पेक्षा कमी | | |
| | | CD Ratio - ७०% पेक्षा जास्त | | |
| | | Gross N.P.A. - १०% पेक्षा जास्त | | |
| | | Net N.P.A. - ५% पेक्षा जास्त | | |
| | | थकबाकी - १०% पेक्षा जास्त | | |
| | | के.वाय.सी. पुर्तता-१००% पेक्षा कमी | | |

उपरोक्तप्रमाणे विभागीय सहनिबंधक व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी वेळोवेळीच्या मासिक सभेमध्ये आढावा घ्यावा. याबाबतचा संख्यात्मक प्रगती अहवाल दि.३०/०४/२०२६ पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

(दिपक तावरे भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे